महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

**वर्ष ६७ वे, अंक दुसरा-तिसरा**

**आषाढ १९४६ ते मार्गशीर्ष १९४६**
**जुलै ते डिसेंबर २०२४**

## ‘छत्रपती शिवाजी महाराज आणि बृहन्महाराष्ट्र’ विशेषांक

## संपादक मंडळ

**डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)**
**माधव रामराजे चौसाळकर**
**डॉ. शैलजा जोशी**
**मीना जहागिरदार**
**व्यंकटेश कुलकर्णी**
**डॉ. गायत्री शिरोळे**

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

**कार्यवाह**

म. सा. प. तेलंगण राज्य

४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.

**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४ / ९२९३५०५०३९

(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

**प्रकाशक**

डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. डॉ. शैलजा जोशी - ९२९३५०५०३९
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphyd@gmail. com

वार्षिक वर्गणी रु. ४००/- स्पीड पोस्ट सह रु. ६००/-
(एका वर्षातील सर्व अंक स्पीड पोस्टने हवे असल्यास एक वर्षाची वर्गणी)

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Sultan Bazar, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 IFSC Code – IBKL0000594
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. २५०/-
टपाल खर्च : रु. ५०/-

अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, एरंडवणे, पुणे ४११००४.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय ........................................................................ ५

राजमाता जिजाबाई .................................... मंजरी ताम्हनकर .................... ९

शिवराज्याभिषेक :
हिंदवी स्वराज्य स्थापनेचा सुवर्णक्षण ................ डॉ. गीता काटे .................... १९

छत्रपती शिवाजी महाराज आणि बेंगळुरू ............ डॉ. अर्चना मुकुंद अचलेरकर .... २७

शिवराज्याभिषेक : गोव्यासह आंतरराष्ट्रीय
इतिहास प्रभावित करणारे तेजस्वी पर्व ............... डॉ. विनय मडगांवकर ............ ३१

छत्रपती शिवाजी महाराजांचा
दक्षिण दिग्विजय : इ. स. १६७६-१६७८
मोहिमेतील यशस्वी युद्धनीती, कौशल्य
आणि स्वराज्य विस्तार ................................ विक्रमसिंह ज. मोहिते ............ ४३

मराठ्यांना झुंजवणारा वेल्लोरचा किल्ला ............. श्री. महेश तेंडुलकर .............. ५१

शिवछत्रपतींची महाराष्ट्राबाहेरील पत्रे ................. डॉ. अनुराधा कुलकर्णी ........... ५५

पराक्रमी छत्रसाल ...................................... डॉ. विद्या देवधर ................. ६४

तंजावर मराठा साम्राज्य
विद्वान सरफोजीराजे - २ ............................. विक्रमसिंह ज. मोहिते ............ ७०

छत्रपती शिवाजी महाराज - श्रीमंत योगी ............. मीना खोंड ........................ ७८

छत्रपती शिवाजी महाराज आणि
कोकण किनारपट्टीचा कोळी समाज .................. अर्चना महेश देशमुख ............ ८८

सुरतेवरील हल्ला : मोगलांना दिलेला शह ........... व्यंकटेश कुलकर्णी ............... ९३

माळव्यामध्ये शिवशाही .............................. सीमा जयंत भिसे ................. ९७

मराठेशाहीचा पूर्व भारतातील
राज्यविस्तार आणि सांस्कृतिक योगदान ............. सुधीर थोरात ................... १०३

शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका ............... अपर्णा कुलकर्णी .............. ११४

धर्मच्छलाच्या भीषण नाट्यात होरपळलेल्या
एका गावाची कहाणी : 'तांडव' ...................... प्रा. विनायक ल. बापट ....... १२०

शिवशाहीवर आधारित मराठी कथा :
ऐतिहासिक तथ्यांच्या आधारे विश्लेषण ............. प्रा. नवसो विश्राम परब ....... १२८

**वेध विदेशी भाषांचा – साहित्याचा**

कदम कदम बढाये जा... ............................ चिन्मय रहाळकर .............. १३६

**ग्रंथपरीक्षण**

१) भुईचा लळा लावणाऱ्या कविता -
भुईचे लळासे .................................. डॉ. शरद ठाकर ............... १४३

२) आयी चांदनी रात.... .......................... अरुण डवलेकर ............... १४९

**संस्थावृत्त**

१) विदुषी मालिनीताई राजुरकर
विशेषांक प्रकाशन ............................. अरुण डवलेकर ............... १५५

२) दत्तोपासक संत सर्वज्ञ दासोपंत
पुस्तक प्रकाशन सोहळा....................... अरुण डवलेकर ............... १५७

३) अभिजात मराठी सन्मान सोहळा ............. गिरीश श्रीपाद मोंडकर ........ १५९

स्वागत नव्या पुस्तकांचे ........................................................ १६२

लेखक परिचय ................................................................... १६३

# शिवराज्याभिषेक : गोव्यासह आंतरराष्ट्रीय इतिहास प्रभावित करणारे तेजस्वी पर्व



**डॉ. विनय मडगांवकर**

**प्रास्ताविक :**

प्राचीन काळापासून भारत सर्वार्थाने समृद्ध होता. जगभरातील व्यापारी शतकानुशतके व्यापार करणाच्या उद्देशाने वैभवसंपन्न भारतात येत होते. त्यात युरोपातील देशांचाही समावेश होता. पंधराव्या शतकात अरब राजकर्त्यांच्या आधीन असलेले पोर्तुगाल व स्पेन हे देश नंतर स्वतंत्र झाल्यामुळे अरबांनी खुष्कीच्या मार्गाने भारतातील माल नेण्यास त्यांना प्रतिबंधित केले. भारतात येण्याचा अन्य मार्ग त्यांना ठाऊक नसल्याने भारताशी थेट व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने वास्को-द-गामाने समुद्रमार्ग शोधला. त्याच समुद्रमार्गाने पुढे पोर्तुगाली आक्रमक अल्बुकर्क भारतात प्रचंड सैन्यासह आला. २५ नोव्हेंबर १५१० रोजी त्याने आदिलशाही सैन्याचा पराभव करून तिसवाडी-गोवा जिंकून घेतला. पुढे आदिलशहाने सासष्टी आणि बारदेश हे दोन तालुके पोर्तुगीजांना बहाल केले. गोव्यात सत्ता प्राप्त होताच पोर्तुगीजांनी छळाने आणि बळाने स्थानिक जनतेचे ख्रिस्तीकरण करायला आरंभ केला. त्या काळात पोर्तुगीजांचे हे अमानुष अत्याचार रोखणारा कोणीच राज्यकर्ता नव्हता. सतराव्या शतकात गोव्यातील परकीय पोर्तुगीजांना सडेतोड प्रत्युत्तर देणाऱ्या सामर्थ्यशाली शिवशाहीचा महाराष्ट्रात उदय झाला. प्रस्तुत शोधनिबंधात शिवराज्यभिषेकाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज, त्यांची राजसत्ता, लष्करी मोहिमा, आरमार यांचा गोमंतकीय इतिहास, साहित्य, कला, संस्कृती, समाजजीवन त्याचबरोबर युरोपीय पोर्तुगीजांवर झालेल्या परिणामांचा संशोधनात्मक परामर्श घेतला आहे.

**शिवराज्याभिषेक – सार्वभौमत्वाची प्रतिष्ठापना**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने रायगड किल्ल्यावर मराठा साम्राज्याच्या सार्वभौमत्वाची अधिकृत प्रतिष्ठापना झाली. स्वराज्याच्या कारभारासाठी महाराजांनी सक्षम यंत्रणा उभी केली. प्रशासनाची आठ विभागांत

विभागणी करून आठ मंत्र्यांची परिषद अष्ट-प्रधान मंडळ म्हणून स्थापित केली. याच अष्टप्रधान मंडळातील 'अमात्य' रामचंद्रपंतांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामर्थ्यशाली साम्राज्याचे वर्णन 'आज्ञापत्र' या ग्रंथात केले आहे. सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य, शतावधि किल्ले, तसेच जलदुर्ग, किती एक विशाल स्थले, चाळीस हजार पागा व साठ-सत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोट्यवधी खजिना, तसेच उत्तम जवाहीर, सकळ वस्तुजात संपादिलें. शाण्णव कुळींचे मराठे यांचा उद्धार केला. सिंहासनारूढ होऊन छत्र धरून छत्रपति म्हणविलें. धर्मोद्धार करून देव-ब्राह्मण संस्थानीं स्थापून यजनयाजनादि षट्कर्मे वर्णविभागें चालविली. तस्करादी अन्यायी यांचें नाव राज्यांत नाहींसें केलें. देशदुर्गादि सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविलें. केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली. [१] शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या हिताकडे लक्ष देत शेतीला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. व्यापाराच्या वाढीशी आणि उद्योगांच्या संरक्षणाचीही त्यांना तितकीच काळजी होती. शिवछत्रपतींनी भूमीबरोबर समुद्रावरही अधिराज्य गाजवले. त्यामुळे समुद्रमार्गी भारतात येणाऱ्या इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्तुगीज या सत्ताभिलाषी युरोपीयनांना वठणीवर आणले. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीजांच्या आधीन असलेल्या गोव्याला सामरिक महत्त्व होते. गोमंतभूमीवर हिंदवी स्वराज्य प्रस्थापित झाल्यास शिवाजी महाराजांना एक महत्त्वाचे बंदर शहर आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रवेशद्वार उपलब्ध झाले असते. त्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गोव्यापासून काही मैल अंतरावर असलेल्या रायगड किल्ल्यावरील शिवसाम्राज्याच्या सामर्थ्याचा गोव्यातील परदेशी पोर्तुगीज प्रशासनावर विलक्षण प्रभाव पडला होता.

## पोर्तुगाली सत्तेचा आलेख मांडणारी 'महिकावतीची बखर'

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या युरोपीय पोर्तुगाली सत्तेला आपल्या धाकात ठेवले, त्या परदेशी पोर्तुगीजांच्या सत्तासामर्थ्याचा परिचय येथे अनुस्यूत आहे. सोळाव्या शतकाच्या आरंभी भारतात आलेले पोर्तुगीज अधिक व्यवहारी आणि मुत्सद्दी होते. त्यांनी कालिकट आणि कोचीन येथील राजांचे आपसातील शत्रुत्व लक्षात घेतले. कालिकटच्या झामोरीनच्या मदतीने इ. स. १५०० मध्ये कालिकट येथे पोर्तुगीजांनी आपली वखार सुरू केली. पुढे कोचीनचे साहाय्य घेतले आणि कालिकट उद्ध्वस्त केले. कालांतराने कोचीनवरही पोर्तुगीजांनी अधिकार मिळवला. पोर्तुगीजांनी आरमाराच्या बळावर व्यापार वाढविला. त्याचबरोबर आपल्या वसाहती

निर्माण केल्या. पोर्तुगीजांच्या या कारवायांचे वर्णन 'महिकावतीची बखर' या ग्रंथात केशवाचार्य यांनी केले आहे. ''फिरंगी या प्रांति शालिवाहन शके १४२२ तथा फिरंगी शक येक हजार पाचसे - १५०० मध्ये पोर्तुगीज होवोन तारवे दोन घेवोन आले ॥ त्याणे प्रथम प्रथम येतां च कोचि बंदर कबज केले ॥ तेथोन गोवे घेतले॥ तेथोन तारवें अरमाद घेवोन आला॥''[२] तिसवाडी जिंकल्यापासून पोर्तुगीजांनी तीव्र गतीने गोमंतकीय जनतेचे ख्रिस्तीकरण केले, प्रतिघात करणाऱ्या गोमंतकीयांना छळून ठार मारले, देवस्थानांचा विध्वंस केला, धार्मिक ग्रंथ जाळून राख केले. येथील जनतेचा अमानुष छळ केला. 'गोव्यात पोर्तुगीज जेते होते. 'जीत राष्ट्रावर आपले अधिकार गाजवणाऱ्या जेत्यांनी 'Assimilacao' व 'Sujeicao' ही राज्यकारभाराची दोन धोरणे स्वीकारलेली दिसतात. यापैकी 'Assimilacao' या पहिल्या धोरणानुसार जेत्यांनी आपली संस्कृती जीत राष्ट्राला स्वीकारावयाला भाग पाडावयाचे आणि त्यांची संस्कृती नष्ट करायची, तर 'Sujeicao' या दुसऱ्या धोरणानुसार जीत राष्ट्राची संस्कृती राखून त्यावर सत्ता चालवायची व संपत्तीशोषण करावयाचे. पोर्तुगालने गोव्यात जीत राष्ट्राची संस्कृती, भाषा, धर्म, रीतिरिवाज इत्यादी नष्ट करावयाचे 'Assimilacao'चें धोरण स्वीकारले.'[३] त्याला अनुसरून पोर्तुगीजांनी गोमंतकीय भाषा, संस्कृती, रीतिरिवाज, प्रथापरंपरा इत्यादी नष्ट करत गोव्यावर राज्य केले. गोमंतकीयांची श्रद्धास्थाने असलेल्या मंदिरांवर आघात केले.

### गोव्यातील पोर्तुगाली छळाला शिवशाहीचे प्रबळ प्रत्युत्तर

पोर्तुगीजांनी गोव्यात आपले सत्तासामर्थ्य वाढवण्यासाठी येथील जनतेचे ख्रिस्तीकरण करत देवस्थानावर प्रहार केलेत. गोव्यात राहिलेला पोर्तुगीज इतिहासकार कुन्हा रिव्हरा यांनी पोर्तुगीजाविषयी लिहिले आहे - 'जिंकायच्या पहिल्या कैफात देवळं उद्ध्वस्त केली गेली. स्थानिक भाषेतील पुस्तकं दोषी ठरवून किंवा मूर्तिपूजेची शिकवण असल्याच्या संशयाने जाळून टाकली.'[४] 'पोर्तुगालचा तिसरा राजा दों ज्युआंव याने गोव्याच्या गव्हर्नरला ३० जून १५४१ रोजी दिलेल्या आदेशानुसार गोव्यातील पोर्तुगीज सरकारने तिसवाडीतील सगळी देवळे नष्ट केली.'[५] 'मराठी रियासत'मध्ये रियासतकारांनी पोर्तुगीजांच्या कृत्यांचा आलेख मांडत असतानाच शिवाजी महाराजांच्या अनिवार्य आणि तीव्र प्रतिघाताचा परामर्श घेतला आहे. 'पोर्तुगीझ लोक लूट व जाळपोळ करून रयतेचा उच्छेद करीत आणि हिंदूंस पकडून त्यांस जबरदस्तीनें क्रिस्ती करीत. अशा अनेक कारणांस्तव त्यांचा या प्रदेशांतून उठावा करणें, निदान त्यांस चांगलें धाकांत ठेवणें शिवाजीला अपरिहार्य

झाले. त्यामुळे त्याच्या हयातींत उभयतांचा वैरभाव कैक वर्षे चालू राहिला.'[६] 'पोर्तुगीज विजराई कोंदी द संव्हिसेंती याने '२१ सप्टेंबर १६६७' रोजी बारदेशमधील हिंदूंना दोन महिन्यांच्या मुदतीत एकतर ख्रिस्ती व्हा, अन्यथा बारदेश सोडून पोर्तुगीजशासित गोव्याच्या हद्दीबाहेर निर्वासित व्हा, असा हुकूमनामा काढला होता. याचा उल्लेख त्यांच्या राष्ट्रीय ग्रंथालयातील हस्तलिखित नंबर ८५३८ मध्ये आहे.'[७] ती मुदत संपण्याआधी शिवाजी महाराजांनी '१९ नोव्हेंबर १६६७' रोजी गोव्यातील कोलवाळच्या किल्ल्यातील पोर्तुगीजांवर स्वारी केली. झुंजार मराठ्यांना पोर्तुगीज शरण आले. शिवाजी महाराजांचा मराठी भाषेतील शर्तनामा पोर्तुगीजांनी मान्य केला. गोमंतकात ख्रिस्तीकरणाच्या निमित्ताने जनतेचा अमानुष छळ करणाऱ्या या परकीय पोर्तुगीजांना रोखण्यास सतराव्या शतकात सार्वभौम शिवसाम्राज्याचा धाक प्रभावी ठरला. गोव्यातील पोर्तुगाली छळाला प्रथमच शिवशाहीने प्रबळ प्रत्युत्तर दिले.

## गोव्यातील एक अपूर्ण गुप्त लष्करी मोहीम

शिवाजी महाराजांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत मुघलांकडून भारतीय प्रदेश आणि पोर्तुगीजांकडून गोवा जिंकून घेण्यासाठी अनेक मोहिमा आखल्या. मुघल आणि पोर्तुगीज यांना पराभूत करून शिवशाहीचा विस्तार करणे, हा या लष्करी प्रयत्नांचा मुख्य उद्देश होता. 'श्रीसप्तकोटेश्वर मंदिर निर्मिती' ही अशीच एक गुप्त लष्करी मोहीम होती. नार्वेहून मांडवी नदीच्या पैलतीरी असलेले गोवें शहर दृष्टीस पडते. मंदिर निर्मितीच्या निमित्ताने मराठे मोठ्या संख्येने दाखल झाले होते. 'पोर्तुगीजांना गोव्यातून हाकलून देण्याच्या मसलतीत श्री सप्तकोटेश्वर मंदिर निर्मिती प्रक्रियेचा' समावेश केला होता. अर्थात हा सुनियोजित गनिमी कावा होता, हे तत्कालीन पत्रव्यवहाराच्या संदर्भाचा अभ्यास करून प्रमाणित झाले आहे. या पत्रांचा संदर्भ वा. सी. बेंद्रे यांनी 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सात्मक चरित्र' या ग्रंथात दिला आहे. 'इंग्रजांनी कारवारहून १२ नोव्हेंबर १६६८ रोजी अशी माहिती दिली आहे, की कोंदी द सांव्हिसेंती या विजरईस प्रस्तुत कटाची बातमी लागली होती. त्याने शहरात तपास करून, घुसलेल्या चार-पाचशे शत्रूच्या लोकांस परतवून लावले.'[८] तसेच 'पोर्तुगीज व्हाईसरॉय आपल्या राजास २८ डिसेंबर १६६८ला लिहितो, आमच्या कारकिर्दीस प्रारंभ होताच यंदा बार्देश व सासष्टी हे प्रांत घेण्याची शिवाजीची इच्छा होती, पण आमचा बंदोबस्त असल्यामुळे त्याला आपला हेतू तडीस नेता आला नाही.' याच काळात मंदिरनिर्मितीचे कार्य सुरू होते,

अर्थात गोवा जिंकायची पूर्वतयारी, गुप्त लष्करी मोहीम सुरू होती, जी अपूर्ण राहिली. 'हे देवालय पूर्वी दिवाडी बेटांत होतें. तें सन १५४०त मिगेल व्हाज ह्या पोर्तुगेज धर्माधिकाऱ्यानें गोवा बेटांतील इतर देवलयाबरोबर मोडून टाकले.'[९] गोमंतकातील कादंब राजांचे राजदैवत श्रीसप्तकोटेश्वराचे भव्य मंदिर नार्वे-डिचोली येथे शिवरायांच्या आज्ञेने उभारून त्यात श्रीसप्तकोटेश्वर शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापना केली. शिवाजी महाराजांचा दुसरा राजाभिषेक करणाऱ्या निश्चलपुरी गोसावींनी या श्रीसप्तकोटेश्वर शिवशंकाराचे दर्शन घेतल्याची नोंद 'श्रीशिवराज-राजाभिषेक - कल्पतरू' ग्रंथात आहे.

## शिवरायांचा दुसरा राज्याभिषेक आणि गोमंतक [६]

गागाभट्टांनी शिवाजी महाराजांचा पहिला राज्याभिषेक वैदिक पद्धतीने रायगडावर केला. महाराजांच्या कर्तृत्वाला राजमान्यता प्राप्त झाली. त्या वेळी निश्चलपुरी योगी रायगडावर उपस्थित होते. त्यांनीच शिवाजी महाराजांचा दुसऱ्यांदा राज्याभिषेक केला. राज्याभिषेक समारोहानंतर निश्चलपुरी गोसावीने तीर्थाटनाला प्रस्थान केले. तीर्थयात्रेवेळी त्यांनी कोंकणातील संगमेश्वर, गणपतीपुळे, धूतपापेश्वर, राजापूरची गंगा, कुडाळेश्वर अशा पवित्र तीर्थक्षेत्रांना भेट दिली. तसेच शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या आधी इ.स. १६६८ मध्ये नार्वे-गोवा येथे उभारलेल्या शिवालयातील श्रीसप्तकोटेश्वर शिवशंकराचे दर्शन घेतले. 'श्रीशिवराज-राजाभिषेक-कल्पतरू' या ग्रंथात दुसऱ्या राजाभिषेकाबद्दल निवेदन करताना ग्रंथारंभी निश्चलपुरींनी दर्शन घेतलेल्या श्रीसप्तकोटेश्वर शिवालयाचे विवरण केले आहे. जयते कर्मसुयोगादश्वमेधशताधिकं । दृष्ट्वा तीर्थानि सर्वाणि सप्तकोटीश्वरं गातः ॥ शिवराजकृतं तत्र देवालयमनुत्तमं । दृश्यते दूरतो लोकैः कैलास इव पर्वत ॥ जीर्णोद्धारे कृते पुण्यं नुत्नकोटी गुणं भावेत् । इति ज्ञान्वा महाराजशिवराजेन करीत ॥ सौधः परम कल्याणः सप्तकोटीश्वरस्य यः। क्षत्राश्ययें परं पंचगंगाम्ध्ये प्रदृश्यते॥ जन्माष्टम्यां बिल्वपत्र गीरिरूत्पद्यते सदा ॥[१०] प्रस्तुत ग्रंथातील वर्णनानुसार नार्वे-डिचोली येथे 'शिवराजाने बांधलेले उत्कृष्ट मंदिर आहे. कैलास पर्वताप्रमाणे ते जगाला दुरूनच दिसते. श्रीसप्तकोटेश्वर मंदिराजवळ पवित्र पंचगंगा म्हणून लोकमान्यताप्राप्त तीर्थक्षेत्र आहे. तेथे गोकुळाष्टमीचा उत्सव भक्ती-भावाने साजरा केला जातो. या शिवकालीन मंदिराची स्थापत्यशैली विलोभनीय आहे. कोल्हापूरच्या श्री अंबाबाई मंदिराप्रमाणेच गोमंतकातील श्रीसप्तकोटेश्वर शिवमंदिरात किरणोत्सव होतो. येथे एक संस्कृत शिलालेख आहे, ज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी श्रीसप्तकोटेश्वर मंदिर

बांधल्याचे नमूद केले आहे. इतकेच नव्हे, तर तेथे शिवाजी महाराजांच्या हाताचे ठसे असल्याचेही इतिहास अभ्यासक सर्वेश बोरकर यांना दिसून आले आहे.

### शिवसामर्थ्याची वृद्धिंगत गतिशीलता

राज्याभिषेकामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतातील यावनी राज्यांच्या वर्चस्वाला नाकारले, तसेच गोव्यातील जनतेला पोर्तुगीज राजवटीचा प्रतिकार करण्यास प्रेरित केले. त्यामुळे रायगडावरील शिवराज्याभिषेकाचा प्रभाव गोव्यातील पोर्तुगीज प्रशासनावर पडणे स्वाभाविक होते. राज्याभिषेकानंतर, शिवाजी महाराजांच्या गोवा जिंकून घेण्याच्या प्रयत्नांमुळे मराठ्यांच्या लष्करी सामर्थ्याच्या गतिशीलतेत लक्षणीय वृद्धी झाली. आक्रमकतेबरोबर प्रजारक्षणास ते अधिक प्राधान्य देत होते. विशेषत: शत्रूच्या हल्ल्यादरम्यान महाराज आपल्या प्रजेचे रक्षण करण्यासाठी अत्यंत दक्ष असत. शिवाजी महाराजांच्या गोव्याच्या दिशेने केलेल्या लष्करी कारवाईचे नेमके स्वरूप आणि व्याप्ती या दृष्टीने अभ्यासनीय आहे. झुंजार मराठ्यांनी भारतात बलाढ्य सल्तनत असलेले मुघल आणि समुद्रात आपली सत्ता गाजवणारे पोर्तुगीज या दोघांच्याही वर्चस्वाला स्वीकारले नाही. त्यामुळे शिवरायांच्या शिवशाहीचा गोव्यातील राजकीय आणि आर्थिक परिस्थितीवर दीर्घकालीन परिणाम झाला. शिवाजी महाराजांच्या गोव्यातील पोर्तुगीजांच्या विरोधात सुरू केलेल्या तत्कालीन लष्करी मोहिमा अधिक धोरणात्मक होत्या, हे उपरोल्लिखित मोहिमांच्या विश्लेषणाने स्पष्ट होते.

### शिवछत्रपतींचे गोव्यातील 'हिंदवी स्वराज्य'

पोर्तुगीज, डच हे पाश्चात्त्य लोक तोफा, बंदुका चालविण्यात आणि दर्यावर्दी कामांत विशेष निपुण म्हणून प्रसिद्ध होते. या दोन्ही क्षेत्रांत आपल्या मराठ्यांनी पारंगत व्हावे, अशी शिवाजी महाराजांची इच्छा होती. विजापूर, मोगल इत्यादीकांशी शिवाजी महाराजांचे युद्धप्रसंग सुरू झाले म्हणजे हे पाश्चात्त्य दर्यावर्दी लोक त्यांच्या शत्रूस दारूगोळा व हत्यारे पुरवीत, तसेच तोफांचे काम करणारे कुशल गोलंदाजही पाठवीत. गोव्यातील पोर्तुगीजांनी सन १६६६मधील वेढ्याच्या प्रसंगी फोंड्यातील आदिलशाही सैनिकांना मदत केली होती. त्यामुळे हा किल्ला जिंकून घेणे कठीण झाले होते. अशी गोष्ट पुन्हा होऊ नये म्हणून छत्रपती शिवाजीमहाराजांनी पोर्तुगीजांकडून तटस्थ राहण्याचे वचन घेतले आणि राज्याभिषेकाच्या पुढील वर्षी (स. १६७५) दिनांक १८ एप्रिल रोजी महाराजांच्या मर्द-मराठ्यांनी फोंड्याच्या

किल्ल्यास वेढा घातला. हा वेढा चालू असताना मराठ्यांनी पोर्तुगीजांच्या अंमलांतील 'चांदर' या प्रदेशावर २९ एप्रिल रोजी दुपारी बारा वाजता हल्ला केला. त्याच दिवशी कुंकळी या साष्टीतील गावामध्ये रणमस्तखान नावाच्या विजापूरकराच्या सरदाराला पळवून लावले. १६ मेच्या सुमारास शिवाजी महाराजांनी फोंडा किल्ला जिंकून घेतला. त्यामुळे मराठ्यांच्या अमलाखाली अंत्रूज, अष्टाग्रार, हेमाडबार्से, बाळी, चंद्रवाडी व काकोडे म्हणजे आताचे फोंडे, सांगे, केपे व काणकोण हे महाल आले होते. महाराजांनी फोंड्याच्या किल्ल्याची डागडुजी करवून घेतली आणि मुख्य दरवाजावर गणेशपट्टी बसवली. आदिलशाही सत्तेचा महंमदखान फोंड्याचा शेवटचा किल्लेदार होता. शिवाजी महाराजांनी त्रिंबक पंडित यास फोंड्याचा सुभेदार नेमला. याच महिन्यांत शिवाजी महाराजांनी शिवेश्वर व अंकोला हे किल्ले घेतले, कडवार (कारवार) जिंकून घेतले. 'पोर्तुगेज-मराठा संबंध' या ग्रंथात डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांनी हा आलेख मांडला आहे. गोव्यातील पेडणे, बारदेश, डिचोली, सत्तरी या तालुक्यांतील प्रदेशांवर शिवाजी महाराजांचा अंमल होताच, तो आता संपूर्ण कोकणावर प्रस्थापित झाला. शिवशाहीची राजधानी रायगड किल्ल्यापासून सुरू झालेल्या मराठ्यांच्या या वेगवान गतिशील लष्करी मोहिमेचा थेट प्रभाव मोगल, आदिलशहा, पोर्तुगीज यांच्या प्रदेशावर होत होता.

## हिंदवी स्वराज्याचे नौदल आणि पोर्तुगीज

पोर्तुगीज हिंदी महासागरावर आपली सत्ता आहे, असे शिवकालातसुद्धा मानीत. त्यामुळे आदिलशाहा, मोगल, इकेरीचे राजे व खुद्द शिवाजी महाराज यांच्या राज्यांतील व्यापारी तारवांस समुद्रात फिरकण्यास पोर्तुगीजांचे दस्तक (Cartaz) घ्यावे लागत होते. Cartaz घेण्यासाठी त्यांना पैसे द्यावे लागत. याशिवाय काही नियम व अटी पाळणे बंधनकारक होते. पोर्तुगीज आरमारांनी शिवाजी महाराजांची व्यापारी जहाजे दस्तकाशिवाय आढळल्यामुळे ती कैद करून नेल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांनीही त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देत पोर्तुगीज व्यापाऱ्यांच्या नौका समुद्रात पकडल्याची उदाहरणे आहेत. सुरतपासून कारवारपर्यंत अविच्छिन्न समुद्रकिनारा आपल्या ताब्यात असावा, असा महाराजांचा उत्कट प्रयत्न होता. पश्चिम किनाऱ्यावरून परदेशाशी मोठा व्यापार चालत होता, त्याचा लाभ शिवशाहीला होत होता. सागरी व्यापार आणि सीमाशुल्क यातून मिळणारे उत्पन्न वाढविण्यासाठी व्यापारी जहाजे आणि बंदरांचे रक्षण करण्यासाठी नौदलाच्या उभारणीवर महाराजांनी लक्ष केंद्रित केले.

### 'आरमार' अवश्यमेव करावे

अमात्य रामचंद्रपंतांनी 'आज्ञापत्र' या ग्रंथाच्या नवव्या प्रकरणात आरमाराचे महत्त्व स्पष्ट केले आहे. ''आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जसे ज्यास अश्वबल तसी त्याची पृथ्वीप्रजा आहे, तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र. याकरितां आरमार अवश्यमेव करावें. चालीच्या गुराबा बहुत थोर ना बहुत लहान, ऐशिया मध्यरीतीनें सजाव्या. तशींच गलबतें करावी. थोर बहुत वारसे जार्गात जें वाऱ्याविणें प्रयोजनाचेच नव्हे असें करावयाचें प्रयोजन नाहीं. कदाचित् एक दोन सलाबतीमुळे केलें तरी जें आरमार करावें त्यावर मर्दानी मारक माणूस, भांडीं, जंबुरें, बंदुका, दारूगोळी, होके आदिकरून आरमारी प्रयोजनी सामान यथेष्ट बरें सदुतें करावें.''[११] छत्रपती शिवाजी महाराजांना सागरी नौदल शक्तीचे महत्त्व ज्ञात होते. पश्चिम समुद्रकिनारा हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची सागरी सीमा होती. इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी या आक्रमकांपासून स्वराज्याच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी महाराजांनी आपले सक्षम मराठा नौदल स्थापन केले. नौदलात विविध प्रकारची चारशे जहाजे होती. त्यात गुरब, गलबत आणि पाल या युद्धनौकांचा समावेश होता. शिवाजी महाराज सागरी किल्ल्यांचे महत्त्व जाणून होते. सागरी किल्ले नौदलाला संरक्षण देतील आणि पोर्तुगीजांच्या सिद्दींवर नियंत्रण ठेवतील, या विचाराने महाराजांनी १६६४ मध्ये मालवणच्या भर समुद्रात बलाढ्य सिंधुदुर्ग उभारला. त्याच सुमारास विजयदुर्ग नावाचा किल्ला मजबूत केला, सिद्दी सत्तेचा प्रतिकार करण्यासाठी राजपुरीसमोरील एका छोट्या बेटावर पद्मदुर्ग नावाचा किल्लाही बांधला. 'विजरई कौदि द सांव्हिसेंति' याने मराठ्यांच्या आरमाराविषयीं पुढील मत सन १६६७ च्या अखेरीस पोर्तुगालच्या राजास कळविलें होतें. विजरई लिहितो, 'शिवाजीचें नौदलहि मला भीतिदायक वाटतें. कारण त्याच्याविरुद्ध आम्ही सुरुवातीसच कारवाई न केल्यामुळे त्यानें किनाऱ्यावर किल्ले बांधिले आणि आज त्याजवळ पुष्कळ तारवें आहेत.'[१२] अशा या प्रबळ नौदलाच्या कुशल कार्यक्षमतेने समुद्रावर हक्क दर्शवणाऱ्या पोर्तुगीजांच्या नियंत्रणाला प्रतिबंधित केले.

### शिवराज्याभिषेक आणि गोव्यातील पुरुषोत्तमभट वाळवे

राजधानी रायगडावर ३०मे १६७४ रोजी शिवराज्याभिषेकाच्या धार्मिक विधींना आरंभ झाला. सलग आठ दिवस विविध धार्मिक कृत्ये पार पडली. आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशी दिनांक ६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराज विधिवत राजछत्र धारण करत सुवर्णसिंहासनावर विराजमान झाले. राजे

शिवछत्रपती झाले. या संपूर्ण धार्मिक विधींचे सविस्तर विवेचन गागाभट्टांनी 'शिवराजाभिषेकप्रयोगः' या पोथीमध्ये केले आहे. या गौरवशाली समारोहाला गोमंतकातील वेदशास्त्रसंपन्न पुरुषोत्तमभट वाळवे उपस्थित असल्याचे 'वळावेतिहास सांगे वाडवडलांची कीर्ती' या पुस्तकात प्रा. राजेंद्र केरकर यांनी नमूद केले आहे.[१३] त्या काळात वेदमूर्ती पुरुषोत्तमभट वाळवे यांना अभयपत्र देण्यात आले होते. प्रस्तुत मूळपत्रातील आरंभीचा मजकूर नसल्याने तसेच अन्य कारणांमुळे अभ्यासकांमध्ये याविषयी विविध मतप्रवाह दिसून येतात. प्रस्तुत पत्र 'भारत इतिहास संशोधन मंडळाच्या वर्ष ६१, अंक २-४ च्या अंकात अंतर्गत शिवचरित्र साहित्यखंड १४च्या पृष्ठ क्रमांक ५८' वरती आहे. 'वळावेतिहास सांगे वाडवडलांची कीर्ती' या पुस्तकात ते मोडी लिपीतील पत्र देवनागरी मजकुरासह प्रसिद्ध केले आहे. तो मजकूर असा आहे...

'स्वस्तिश्री राज्याभिषेक शक १५९६ आनंदनाम संवत्सरे आषाढ शुद्ध प्रतिपदा सौम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणी राजमान्य राजश्री चांदजी कदम यांसी आज्ञा केली यैसी जे वेदमूर्ति पुरुषोत्तमभट बिन केशवभट वाळवे शास्त्रसंपन अग्निहोत्री सत्पात्र बहुत थोर ब्राह्मण याचे चालवणे स्वामीस अवशक आगरी तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले असे तुम्ही स्वारीसिकारीमुळे येताजाता भट गोसावियांस उपसर्ग चाल तरी येकंदर न देणे यांची वृत्ती भूमी भिवगडीच्या सुभा व फोंड्याचे सुभा आहे त्यांसही कोण्हेवेसी उपसर्ग न देणे जाणिजे बहुत काय लिहिणे.'

'शालिवाहन शकात ७८ मिळाले म्हणजे इसवी सन येतो.' असे शालिवाहन शकवरून 'इसवी सन' मोजण्याचे सूत्र 'बृहत् पंचांगफलदर्श सार्थ' यात अमृत माधव वाघोलीकर यांनी दिले आहे.[१४] त्यानुसार पत्रातील 'शके १५९६ ला' अधिक (+)७८ केल्यास = '१६७४ हे इसवी सन' येते. याच वर्षी दिनांक ६ जून रोजी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. 'शालिवाहन शकात एकूण ६० संवत्सर आहेत. त्यापैकी प्रस्तुत पत्रात उल्लेख केलेले 'आनंद' हे ४८ वे संवत्सर आहे. हेच शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे संवत्सर आहे. 'ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल त्रयोदशी या तिथीला राज्याभिषेक समारोह झाला, त्याच वर्षी एका महिनाच्या कालावधीत आषाढ महिन्यात प्रस्तुत अभयपत्र शिवछत्रपतींनी वेदमूर्ती पुरुषोत्तमभट वाळवे यांना दिले.' हे या पत्रातील तिथी, महिना आणि संवत्सर यांच्या उल्लेखांवरून स्पष्ट होते.

## शिवरायांचा गोव्यातील पोर्तुगीज चरित्रकार, गोमंतकीय चित्रकार आणि साहित्यक्षेत्र

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुरुषार्थ आणि पराक्रमाचा प्रभाव पोर्तुगाली लेखकांवरही झाला होता. गोव्यातील मुरगाव येथे त्या काळात राहणारा कोस्मे-द-गॉर्दा (COSME DA GUARDA) याने 'VIDA, E ACC, OENS DO FAMOSO, E FELICISSIMO, SEVAGY, DA INDIA ORIENTAL' या नावाने शिवाजी महाराजांचे चरित्रलेखन केले. डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांनी आपल्या 'पोर्तुगेज-मराठा संबंध' या पुस्तकात त्याची नोंद घेतली आहे. गोव्यातील भारतीय आणि युरोपीय प्रभावांचे अनोखे मिश्रण या काळात कला, वास्तुकला, वेशभूषा तसेच पाककृतीमध्ये आढळते. सन १६७४ मधील श्रीशिवप्रभूचा राज्याभिषेक संपूर्ण विश्वभर गाजला. इंग्रज वकील हेन्री ऑक्झिंडेन यांनी या गौरवशाली समारोहाचे ऐतिहासिक भव्यदिव्य शब्दचित्र रेखाटले. त्याला हे सर्व त्याच्या भाषेत सांगणारे इंग्रजांचे दुभाषा नारायण शेणवी हे मूळ गोमंतकीय होते. गोमंतकीय कलाक्षेत्र रंगांचे किमयागार मडगाव येथील दीनानाथ दलाल यांनी शिवराज्याभिषेक हा दिमाखदार ऐतिहासिक क्षण, आकर्षक रंगांनी आविष्कृत केला आहे. गोमंतकातील सिद्धहस्त लेखक विष्णू सूर्य वाघ यांनी 'शिव-गोमंतक' या नाटकात तसेच डॉ. विनय मडगांवकर यांनी 'शिवसाम्राज्य - गोमंतक' या महानाट्य प्रयोगात छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक प्रसंग प्रस्तुत केला होता.

## समारोप

'शिवराज्याभिषेक' हा भारतीयांचे आत्मभान चेतवणारा ऐतिहासिक प्रसंग होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वसामर्थ्याने केलेल्या स्वातंत्र्याच्या या घोषणेने उत्तरेतील मुघल साम्राज्याला तसेच दक्षिणेतील आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही या यावनी सुलतानांच्या सत्तांना आव्हान दिले होते. शिवाजी महाराज उत्तम लष्करी सेनानायक, उत्कृष्ट राजकारणी होते. त्याच्या सैन्यात पायदळ आणि घोडदळ यांचा समावेश होताच. त्यात त्यांनी सागरी सीमा सुरक्षेचे महत्त्व लक्षात घेऊन सामर्थ्यशाली आरमार उभारले. युरोपीय आक्रमकांवर नियंत्रण ठेवले. शिवशाहीच्या उदयामुळे भारतातील धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांवर अत्यंत सकारात्मक प्रभाव पडला. कडक शिस्त, वेगवान हालचाली, उत्कृष्ट बुद्धिमत्ता आणि संरक्षणाकडे सतत लक्ष हे शिवरायांच्या सैन्याचे वैशिष्ट्य होते. सैनिकी मोहिमामुळे प्रजेचे काही नुकसान होणार नाही याची काळजी

महाराजांना होती. महाराष्ट्रातील रयतेप्रमाणे गोमंतकीय जनतेमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत करणे हे महाराजांचे मोठे यश आहे. असंख्य आव्हानांना सामोरे जात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वकर्तृत्वाने नवीन राज्यप्रशासन व्यवस्था निर्माण करून स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर केले. त्यामुळे शिवराज्याभिषेकाने सुप्रतिष्ठित झालेले हे सार्वभौम साम्राज्य गोव्यासह आंतरराष्ट्रीय इतिहास आणि भारतीय समाजजीवन यास प्रभावित करणारे तेजस्वी पर्व ठरले.

**निष्कर्ष :**

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक महोत्सवाने भारताच्या इतिहासात एक तेजस्वी पर्व निर्माण केले.
२. शिवकालीन युद्धतंत्र, युद्धनीती, अर्थनीती आणि राजनीती यांचा परमोत्कर्ष शिवशाहीत झालेला दिसून येतो.
३. राजनीती आणि रणनीती परस्परपूरक कशा होऊ शकतात याचा आदर्श शिवछत्रपतींनी आपल्या कर्तृत्वाने निर्माण केला.
४. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत पोर्तुगीजांकडून गोवा जिंकून घेण्यासाठी अनेक मोहिमा आखल्या होत्या. त्यात 'श्रीसप्तकोटेश्वर मंदिर निर्मिती प्रक्रियेचा' समावेश होता.
५. शिवरायांच्या लष्करी मोहिमांचा उद्देश हिंदवी स्वराज्याचा विस्तार करणे आणि पोर्तुगीज व्यापारमार्ग विस्कळीत करणे हे होते.
६. समुद्रावरही साम्राज्य गाजवणाऱ्या मराठ्यांच्या आरमारमुळे स्वराज्याची संरक्षणक्षमता वृद्धिंगत झाली.
७. वेदशास्त्रसंपन्न पुरुषोत्तमभट वाळवे यांच्या अभयपत्राविषयी अभ्यासकांमध्ये विविध मतप्रवाह दिसून येत असले तरी अभयपत्रातील उल्लेख जुळून येतात.
८. चारित्र्यसंपन्न शिवछत्रपतींचे चरित्र समकालीन पोर्तुगीज चरित्रकाराने लिहिले होते. नंतरच्या काळात गोमंतकीय चित्रकाराने शिवराज्याभिषेकाचे अनुपम चित्र रेखाटले, तर विष्णू वाघसारख्या प्रतिभावंत लेखकाने याच ऐतिहासिक मूलद्रव्याच्या साहाय्याने मनोरम नाट्यशिल्प साकार केले होते.

**संदर्भसूची :**

१. खोले विलास (संपादक) आज्ञापत्र, लोकवाङ्मय गृह, मुंबई, आठवी आवृत्ती २०१२, पृ. ४९.

२. केशवाचार्य, महिकावतीची बखर, संपा. वि. का. राजवाडे, सरिता प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. १०४.
३. सांवर्डेकर बाळकृष्ण, गोमंतक परिचय, तुकाराम सांवर्डेकर, मुंबई, १९९८, पृ. ६७.
४. कुन्हा टी. बी., गोमंतकाच्या राष्ट्रीयत्वाचा ऱ्हास, अनु. प्रफुल्ल गायतोंडे, गोमंतक मराठी अकादमी, गोवा, १९९१, पृ. ४३.
५. सरदेसाई हिरबा, गोमंतकीय ख्रिश्चन समाज निर्मिती व कार्य, कला आणि संस्कृती संचालनालय, गोवा. २००१, पृ. ६१.
६. सरदेसाई गोविंद, मराठी रियासत, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८८, पृ. ३०१
७. पिसुर्लेकर पांडुरंग, पोर्तुगेज-मराठी संबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६७, पृ. ५९.
८. बेंद्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सात्मक चरित्र, मुंबई, १९७२, पृ. ४२१.
९. Gune, VithalTrimbak (1979). Gazetteer of the Union Territory Goa, Daman and Diu. I. Goa, Daman and Diu (India). Gazetteer Dept. p. 64.
१०. भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, क्र. ८८ 'ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड ६वा, १९५५-५६ त्रैमासिक, (१४१-१४४) वर्ष ३६, अंक १-४, पृ. ७९.
११. आज्ञापत्र संपादक विलास खोले, लोकवाङ्मय गृह, मुंबई, आठवी आवृत्ती २०१२, पृ. ८५.
१२. उनि. पोर्तुगेज-मराठा संबंध, पृ. ४३.
१३. केरकर, राजेंद्र, वळावेतिहास सांगे वाडवडलांची कीर्ती, सोनशांती प्रकाशन, डिचोली, गोवा, दुसरी आवृत्ती, २०२४, पृ. २०-२१.
१४. वाघोलीकर अमृत माधव, 'बृहत् पंचांगफलदर्श सार्थ' विद्याविलास श्री सिद्धेश्वर, १९२४, पृ. १७.

■